Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- 230 (A)

## Panchayat Raj System




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Sunil P.Washimkar
Principal
Mahatma Jyotiba Fule
College of Social Work, Yavatmal

**Editor**
Dr. Ganesh R.Gadekar
Assistant Professor
Mahatma Jyotiba Fule
College of Social Work, Yavatmal

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | महात्मा गांधी और भारत में पंचायती राज व्यवस्था प्रा. डॉ. उमावती मोहनचंद्र पवार | 100 |
| 22 | पंचायत राज व्यवस्था आणि शासकीय योजना (उमेद योजना) कु.दीपाली विठ्ठलराव तंबाखे | 104 |
| 23 | पंचायतराज आणि स्त्रियांची भूमिका प्रा.सोनाली रमेश खांडेकर | 109 |
| 24 | ७३ वी घटनादुरुस्ती आणि ग्रामीण विकास : एक विश्लेषणात्मक अध्ययन डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार | 114 |
| 25 | पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका प्रा.डॉ.प्रदीप जगताप | 118 |
| 26 | पंचायत राज व स्त्री सबलीकरण प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 126 |
| 27 | ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका : एक अध्ययन विशेष संदर्भ:वाशिम जिल्हा सहा.प्रा. ए.टी. वाघ | 130 |
| 28 | पंचायतराज व्यवस्था : एक चिकित्सक अध्ययन प्रा.डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 135 |
| 29 | पेसा कायदा आणि पंचायत राज व्यवस्था कु निता दत्तू घडलिग/कु. स्नेहा सोन्याबापू सोळंके | 140 |
| 30 | ७३ वी घटना दुरुस्ती व पंचायत राज्य प्रा. योगेश एस. मुनेश्वर | 144 |
| 31 | पंचायत राज व्यवस्था व ७३ वी घटना दुरुस्ती दीपक आर. आटे | 147 |
| 32 | पंचायत राज व्यवस्था आणि ऐतिहासिक विकास डॉ. प्रांजू हिरेखण | 151 |
| 33 | ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी | 157 |
| 34 | पंचायत राज आणी ७३ घटनादुरूस्ती प्रा.डॉ.संतोष.एस.मिसाळ | 163 |

# पंचायतराज व्यवस्था : एक चिकित्सक अध्ययन

प्रा.डॉ. सुभाष दौलतराव उपाते
सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,देसाईगंज(वडसा),जि.गडचिरोली,म.रा
ई—मेल:supate.1965@gmail.com

**पार्श्वभूमी:**

भारतात अगदी प्राचीन काळापासयून पंचायती अस्तित्वात होते. अर्थात आजच्या पंचायकत राज पध्दतीपेक्षा त्याचे स्वरुप खूपच वेगळे होते. गावातील हूशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी बसायची आणि गावातिल लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावातील वाद, भांडणे सोडविणे, गावाच्या विकासासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करणे, राजाला खंड वसूली देणे. मौर्याच्या काळात त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. सन ८०० ते १००० च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा खऱ्या ग्रामपंचायतीलच्या निर्देशक आहेत. ग्रामपंचायतीची निवडणूक दरसाल होत असे व सर्व सभासद लोकनियुक्त असत. भारतात अनेक साम्राज्ये आली. मोगलांनी ही पध्दत स्विकारली. भारतासारख्या खंडप्राय खेडया—पाडयात विखुरलेल्या देशाला विकेंद्रीत शासनाचीच जरुरी होती. ग्रामीण कारागीर, कष्टकरी यांना पोट भरण्याकरीता व्यवसाय मिळत होता. त्यातुनच खेडी स्वंयपूर्ण बनत होती. शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामपंचायतीची पध्दत चोहीकडे चालू होती. ब्रिटीशांनी मात्र स्वार्थासाठी ही व्यवस्था मोडीत काढली व तलाठी, पोलीस पाटील यांच्या पासून ते कलेक्टर पर्यत नोकरशाहीची फौज निर्माण केली.

१८८२ साली लार्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज्य संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. पण त्यात आरोग्य व प्राथमिक सोयी सुविधा एवढेच उद्दिष्ट होते. महात्मा गांधीनी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात खेडयाकडे जाण्याचा मार्ग दाखविला आणि ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली होती. पण त्यावेळी गावातील उच्च जातीय लोकच निर्णय घेण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असत. यात स्त्रिया व तथाकथीत खालच्या जातींना कोणतेही स्थान नव्हते. ही व्यवस्था समानतेवर आधारित नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांचा या व्यवस्थेला विरोध होता. तरीसुध्दा घटना समितीने सामाजिक उद्दिष्ट म्हणून "राज्ये, ग्रामपंचायत संघटीत करतील व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास आवश्यक अधिकार देतील असे ४०व्या मार्गदर्शक सूत्रात नमुद केले." स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिली पंचवार्षीक योजना अंमलात आली. शेतकऱ्यांचा आणि खेडयातील इतर लोकांचा विकास करुन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सूरु करण्यात आली. पण विकास काही घडून आला नाही. म्हणून बलवंतराय अभ्यास गट तयार केला व या अभ्यास गटाने आपला अहवाल १९५७ साली सादर केला व त्यामध्ये पंचायत राज्याची संकल्पना, दिशा आणि रचनेच्या दूरगामी व आमुलाग्र बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आणि प्रथमच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज्याची संकल्पना मांडण्यात आली. राजस्थान सरकारने बलवंतराय समितीच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची योजना आखली. २ ऑक्टोंबर